Department of Economics
BLD Arts College Pinjar

# बि ए भाग दोन युनिट १

# स्थूल अर्थशास्त्राची ओळख

- स्थूल अर्थशास्त्र – व्याख्या, महत्व आणि मर्यादा

  ( Macro Economics – Definition, Importance and Limitations )

- राष्ट्रीय उत्पन्न व त्याच्या विविध संकल्पना

  (National Income – It`s different concepts)

- राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या विविध पद्धती आणि त्यात येणाऱ्या अडचणी

  (Methods and difficulties in measurements of national income)

**प्रश्न १ - स्थूल अर्थशास्त्राची व्याख्या देवून महत्व सविस्तर लिहा.**

**उत्तर-** स्थूल अर्थशास्त्रालाच समष्टी अर्थशास्त्र, समग्रलक्षी अर्थशास्त्र, सामान्य अर्थशास्त्र, बृहत अर्थशास्त्र, समूह अर्थशास्त्र, सर्वलक्षी अर्थशास्त्र, इत्यादी पर्यायी नावानेही संबोधले जाते. स्थूल अर्थशास्त्राला इंग्रजीत Macro Economics असे म्हणतात. यातील Macro हा शब्द ग्रीकभाषेतील Makros शब्दापासून आलेला आहे. याचा अर्थ मोठा, स्थूल किंवा समग्र असा होतो. म्हणून स्थूल अर्थशास्त्रात अर्थव्यवस्थेच्या एका विशिष्ट घटकाचा अभ्यास केला जात नसून संपूर्ण समूहाचा अभ्यास केला जातो. उदा. राष्ट्रीय उत्पन्न, एकूण रोजगार, एकूण मागणी, एकूण, गुंतवणूक, एकूण बचत, इत्यादींचा अभ्यास केला जातो.

१९२९-३० च्या जागतिक महामंदीपर्यंत संपूर्ण जगात सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व कायम होते. परंतु जागतिक महामंदीमुळे निर्माण झालेल्या समस्या सूक्ष्म अर्थशास्त्र सोडवू शकले नाही. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व कमी होत जावून स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व वाढत गेले. यादरम्यान प्रसिध्द अर्थतज्ञ लॉर्ड केन्स यांनी १९३६ मध्ये 'General Theory of Employment, Interest and Money' लिहिलेल्या ग्रंथाने आमुलाग्र असा आर्थिक बदल घडवून आणला. या ग्रंथात त्यांनी आर्थिक समस्या सोडविण्याची स्थूल किंवा समष्टी पध्दतीचे विश्लेषण केले.

**स्थूल अर्थशास्त्राची व्याख्या -**

प्रो. के. ई. बोल्डिंग यांच्या मते, **"स्थूल अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अशी शाखा होय की, ज्यामध्ये विशिष्ट घटकांचा अभ्यास होत नसून त्या घटकांच्या समूहाचा व सरासरीचा अभ्यास होत असतो. तसेच त्या समूहाची व्याख्या करून त्यातील परस्पर संबंध तपासले जातात."**

Department of Economics
BLD Arts College Pinjar

**स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व (Importance of Macro Economics)**

**१) संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यासः** स्थूल अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेच्या एका विशिष्ट घटकाचा अभ्यास करीत नसून संपूर्ण समूहाचा अभ्यास करते. त्यामुळे स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येते.

**२) सरकारच्यादृष्टीने महत्त्वः** सरकारला आपले ध्येय-धोरण ठरविताना केवळ एक घटकाचा अभ्यास करून चालत नाही तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करावा लागतो. संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अंदाजपत्रक नीती राबविताना, आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण राबविताना, कृषी, उद्योग व सेवाक्षेत्राचा विकासासाठी धोरण ठरविताना सरकारला स्थूल अर्थशास्त्र मार्गदर्शक ठरते.

**३) नियोजनाच्या दृष्टीने महत्त्वः** देशाचा सर्वांगिण व समतोल विकास साध्य करण्याकरिता नियोजनाची नितांत आवश्यकता असते. भारतसरकारने नियोजन आयोगाच्या माध्यमातून पंचवार्षिक योजना राबवून भारताचा सर्वांगिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा या नियोजनाकरिता नियोजनकारांना संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करावा लागतो. त्यादृष्टीने स्थूल अर्थशास्त्र त्यांना मार्गदर्शन करते.

**४) गतिमान अर्थव्यवस्थेचे आकलनः** अर्थव्यवस्था गतिमान असेल तरच देशाचा विकास होत असतो. गतिमान अर्थव्यवस्थेत उत्पन्न, उत्पादन व रोजगारात सतत वाढ होत असते. या गतिमान अर्थव्यवस्थेचे आकलन स्थूल अर्थशास्त्रावरून होते. अर्थव्यवस्थेला गतिमान करणारे घटक व त्या घटकाची कार्यपध्दती समजून घेण्याकरिता स्थूल अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

**५) व्यापारचक्रावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्व:** भांडवलशाही व मुक्तदृष्टीने महत्त्व : भांडवलशाही व मुक्त अर्थव्यवस्थेत तेजी मंदीची व्यापारचक्रे सतत सुरू असतात. तेजीमध्ये वस्तूच्या किंमती सतत वाढत असतात तर मंदीमध्ये त्या सतत कमी होत असतात. अशावेळी स्थैर्यासह देशाचा संतुलित विकास साध्य करण्याकरिता या व्यापारचक्रांवर नियंत्रण

ठेवणे आवश्यक असते. त्यादृष्टीने व्यापारचक्राचे स्वरूप, व्यापारचक्र निर्माण होण्याची कारणे, त्याचे परिणाम जाणून घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करण्याकरिता स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

**६) समाजवादी अर्थव्यवस्थेचा दृष्टीने महत्त्वः** समाजवादी अर्थव्यवस्थेत सरकार एका व्यक्तिचा किंवा एका विशिष्ट घटकाचा विचार करीत नसून संपूर्ण समाजाचा किंवा समूहाचा विचार करीत असते. त्यामुळे समाजवादी अर्थव्यवस्थेच्यादृष्टीने समूहाचा अभ्यास करणाऱ्या स्थूलअर्थशास्त्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**७) मुद्रामुल्यातील बदलाचे आकलनः** अर्थव्यवस्थेतील मुद्रेचे परिणाम वाढले असता किंमतपातळी वाढते व किंमतपातळी वाढल्याने मुद्रेचे मूल्य कमी होते. याउलट मुद्रेचे परिमाण कमी झाले असता किंमतपातळी कमी होते व किंमतपातळी कमी झाल्याने मुद्रेचे मूल्य वाढते. अशाप्रकारे अर्थव्यवस्थेतील मुद्रापरिमाणातील बदलाचे किंमतपातळी व मुद्रामूल्यावर होणाऱ्या परिणामाचे आकलन स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाने होते.

**८) आर्थिक विकासाचे अध्ययनः** अविकसित व विकसनशील देशांना आपला विकास साध्य करण्याकरिता तसेच विकसित देशांना आपला विकास टिकवून ठेवण्याकरिता व त्यामध्ये वृध्दी करण्याकरिता स्थूल अर्थशास्त्राची मदत घ्यावी लागते.

**९) आर्थिक प्रश्नांची सोडवणूकः** स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाने देशासमोरील बेकारी, दारिद्र्य, आर्थिक अस्थिरता, आर्थिक विषमता, वित्तीय तूट, प्रतिकूल शोधनशेष, वाढती लोकसंख्या, कर्जबाजारीपणा, पर्यावरण प्रदूषण, व्यापारचक्र इत्यादी आर्थिक समस्यांची जाणीव होते व ह्या समस्या सोडविण्याचे मार्गदर्शन मिळते.

**१०) आर्थिक सिध्दांताची निर्मितीः** स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाने अनेक महत्त्वाच्या आर्थिक सिध्दातांची निर्मिती झाली आहे. उदा. आर्थिक विकासाचे सिध्दांत, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दांत, रोजगारविषयक सिध्दांत, उपभोगप्रवृत्तीविषयक सिध्दांत, गुंतवणूकीसंदर्भात सिध्दांत, मुद्रामुल्यातीलबदलासंदर्भात सिध्दांत इत्यादी.

**११) सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाला साहाय्यकः** सूक्ष्म अर्थशास्त्राचे विवेचन करताना स्थूल अर्थशास्त्राचे सहाय्य घ्यावे लागते. सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र हे पूर्णपणे स्वतंत्र नसून ते एकमेकास पूरक आहेत. सूक्ष्म अर्थशास्त्राचे सिध्दांत मांडताना स्थूल अर्थशास्त्राची मदत घ्यावी लागते.

**१२) राजकीय पक्षांना महत्त्वपूर्ण:** निवडणुकीपूर्वी प्रत्येक राजकीय पक्ष आपला जाहिरनामा प्रसिद्ध करतात. त्यावेळी ते स्थूल अर्थशास्त्रातील समस्या कशा सोडवू यासंबंधी माहिती देतात. जसे गरीबी हटाव, सबका साथ सबका विकास, रोजगारवृद्धी, ग्रामीण विकास, इत्यादी.

अश्याप्रकारे स्थूल अर्थशास्त्राचे महत्व वरील विविध मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**-----*****-----**

**प्रश्न २ - स्थूल अर्थशास्त्राच्या मर्यादाः (Limitations of Macro Economics)**

**१) समाजातील गटरचनेकडे दुर्लक्षः**

स्थूल अर्थशास्त्रात संपूर्ण समाजाला किंवा समूहाला एक गट समजून त्याचा अभ्यास केला जातो. परंतु समाज हा वेगवेगळया गटांमध्ये विभागलेला असतो व प्रत्येक गटाचे हितसंबंध वेगवेगळे असतात. कधी- कधी तर ते परस्पराच्या विरोधी सुध्दा असतात. उदा. व्यापारी सुध्दा असतात. उदा. व्यापारी व ग्राहक, मालक व मजूर, शेतकरी व शेतमजूर, डॉक्टर- रूग्ण इत्यादी. त्यामुळे प्रत्येक गटाचे हितसंबंध वेगवेगळे असल्याने स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून काढलेले निष्कर्ष सर्वांनाच समानतेने लागू पडत नाहीत.

**२) फसवे निष्कर्षः**

स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून काढलेले निष्कर्ष बऱ्याचवेळा चुकीचे व फसवे असतात. उदा. देशाच्या दरडोई उत्पन्नात वाढ होणे हे आर्थिक विकासाचे एक लक्षण आहे. परंतु देशात प्रचंड आर्थिक विषमता असेल आणि केवळ उच्च उत्पन्नगटातील १० टक्के लोकांचेच उत्पन्न वाढलेले असेल आणि निम्न उत्पन्न गाटातील बहुसंख्य लोकांचे उत्पन्न कमी झालेले असेल तर हा निष्कर्ष केवळ १० टक्के लोकांनाच लागू पडतो, ९० टक्के निम्नगटातील लोकांना नाही.

**३) मापनासंबंधी अडचणः**

स्थूल अर्थशास्त्रात समुच्चयात्मक घटकांचा अभ्यास केला जातो. परंतु या समुच्चयात्मक घटकांचे मापन करणे कठीण आहे. उदा. राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना ज्या वस्तू व सेवांचा विनिमय पैशाच्या सहाय्याने होतो अशाच वस्तू व सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात होतो. परंतु ज्या वस्तू व सेवांचा विनिमय पैशाचा वापर न करता होतो अशा वस्तू व सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात कसा करावा ही समस्या निर्माण होते.

Department of Economics
BLD Arts College Pinjar

**४) किंमत भिन्नतेकडे दुर्लक्षः**

स्थूल अर्थशास्त्रात कोणत्याही नियमाची किंवा सिध्दांताची मांडणी करताना सर्वसामान्य किंमतपातळी विचारात घेतली जाते. परंतु प्रत्येक व्यवहारात वस्तूच्या किंमती वेगवेगळया असतात. उदा. ठोक व किरकोळ किंमती, उपभोग्य वस्तूंच्या व उत्पादन घटकांच्या किंमती, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय किंमती, इत्यादी. तसेच एकाच वस्तूच्या वेगवेगळया प्रदेशात वेगवेगळया उपयोगासाठी, वेगवेगळया कालावधीत वेगवेगळया किंमती असतात अशा किंमतभिन्नतेकडे स्थूल अर्थशास्त्राने दुर्लक्ष केले आहे.

**५) निष्कर्षाचे सामान्यीकरण करणे अयोग्यः**

स्थूल अर्थशास्त्राचा एक महत्त्वाचा दोष म्हणजे यामध्ये वैयक्तिक अनुभवावरून काढलेल्या निष्कर्षाचे सामान्यीकरण केले जाते. परंतु ते अत्यंत चुकीचे आहे.

**६) अतिव्यापकताः**

स्थूल अर्थशास्त्रात संपूर्ण समूहाचा अभ्यास होत असल्याने त्याची व्यापकता प्रचंड वाढली आहे. या अतिव्यापक स्वरूपामुळे स्थूल अर्थशास्त्राच्या अध्ययनात अचूकता निर्माण होत नाही. त्यामुळे येणारे निष्कर्ष परस्पर विरोधी व फसवे असतात.

**७) व्यक्तीहित व समाजहित यामध्ये विरोधाभासः**

स्थूल अर्थशास्त्रामध्ये व्यक्तीहित व समाजहितात बरेचदा विरोधाभास निर्माण होत असतो. उदा. एका व्यक्तीच्या दृष्टीने बचत हा गुण मानला जातो तर संपूर्ण समाजाच्या दृष्टीने बचत करणे हा अभिशाप ठरतो.

वरीलप्रमाणे स्थूल अर्थशास्त्राला अनेक मर्यादा पडत असल्या तरी १९२९-३० च्या जागतिक महामंदीनंतर सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व कमी होत जाऊन स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व वाढत गेले आहे. स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व वाढविण्यामध्ये जे.एम. केन्सची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

**-----*****-----**

Department of Economics
BLD Arts College Pinjar

**प्रश्न ३ राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय ते सांगून राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना स्पष्ट करा.**

(National Income: Concept of National income, GNP, NNP, GDP, NDP, and Per-Capital Income)

राष्ट्रीय उत्पन्न हा स्थूल अर्थशास्त्राचा एक महत्वपूर्ण अभ्यासविषय आहे. देशाचा आर्थिक विकास हा राष्ट्रीय उत्पन्नावर अवलंबून असतो देशाच्या एकूण आर्थिक कामगिरीचे मूल्यमापन राष्ट्रीय उत्पन्नावरून होत असते. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाकडे आर्थिक विकासाचा एक निर्देशक म्हणून पाहिले जाते. एका वर्षाच्या, कालावधीत देशात उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तू व सेवांचे मुद्रेत व्यक्त केलेले मूल्य म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. भारतात व बहुतांश देशांमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत केले जाते. या कालावधीलाच आर्थिक किंवा वित्तीय वर्ष असे म्हणतात.

**राष्ट्रीय उत्पन्न : अर्थ व व्याख्याः** (Meaning and definitions of National Income)

डॉ. मार्शल यांच्या मते, "विशिष्ट राष्ट्रात एका वर्षाच्या कालावधीत मानवी श्रम, भांडवल व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या सहाय्याने जे मूर्त व अमूर्त स्वरूपात वस्तू व सेवांचे निव्वळ उत्पादन होते, त्याला राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात."

**भारतीय राष्ट्रीय उत्पन्न समितीच्या मते,** "विशिष्ट कालावधित उत्पादन करण्यात आलेल्या सर्व वस्तू व सेवांचे द्विमापन न करता केलेले मोजमाप म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय"

**राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पनाः** (Different Concepts of National Income)

राष्ट्रीय उत्पन्नाशी संबंधित काही महत्त्वाच्या संकल्पना पुढीलप्रमाणे आहेत.

**१) स्थूल राष्ट्रीय उत्पादन** (Gross National Product=GDP)

"एका वर्षाच्या कालावधित देशांतर्गत उत्पादित सर्व वस्तू व सेवांच्या अंतिम बाजारमूल्याच्या एकूण बेरजेला स्थूल राष्ट्रीय उत्पादन असे म्हणतात."

स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना त्यामध्ये एका वर्षाच्या कालावधित देशांतर्गत उत्पादित झालेल्या सर्व वस्तू व सेवांच्या अंतिम बाजारमूल्याचा समावेश होतो. तसेच विदेशी व्यापार व देशी-विदेशी नागरीकांच्या सेवांपासून जे निव्वळ उत्पन्न मिळते त्याचा समावेश होतो. स्थूल राष्ट्रीय उत्पादनाची संकल्पना सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे मांडता येईल.

GNP=C+I+G+(X-M) + (R-P)

वरील सूत्रात : C = Consumption (खाजगी उपभोग खर्च), I = Investment (देशांतर्गत खाजगी गुंतवणूक)

G = Government (सरकारी उपभोग खर्च व गुंतवणूक खर्च), (X-M) = export - import (निर्यातमूल्य-आयातमूल्य)

(R-P) = विदेशातून स्वदेशात येणारे उत्पन्न (R)- स्वदेशातून विदेशात जाणारे उत्पन्न (P)

स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे मापन करताना यंत्रसामुग्रीचा घसारा लक्षात घेतला जात नाही. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचा आकडा फुगलेला दिसून येतो. तसेच स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे मापन करताना वस्तूची बाजारकिंमत लक्षात घेतली जाते. परंतु या किंमतीमध्ये सरकारने आकारलेल्या अप्रत्यक्ष करांचा समावेश असतो. त्यामुळे राष्ट्रीय उत्पादनाच्या या संकल्पनेपासून राष्ट्रीय उत्पन्नाची स्पष्ट कल्पना येत नाही.

**२) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन** (Net National Product = NNP):

"एका वर्षाच्या कालावधित देशांतर्गत उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तू व सेवांच्या एकूण बाजारमूल्यातून घसाऱ्याची रक्कम वजा केली असता शिल्लक राहणारी रक्कम म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादन होय." वस्तू व सेवांच्या उत्पादनाकरिता यंत्रसामुग्री, उपकरणे, इमारत यासारख्या भांडवली वस्तूंचा वापर करण्यात येतो. ह्या वस्तूंचे विशिष्ट असे आयुष्य असते. जस-जसे उत्पादन घेतले जाते. तस-तसी त्या वस्तूंची झीज होत असते. अशा झिजेला घसारा म्हणतात. झीज झालेली भांडवली वस्तू कालांतराने निकामी झाल्यानंतर त्या ठिकाणी नवीन वस्तू बसवावी लागते. ही वस्तू बसविता यावी याकरीता घसारा म्हणून उत्पादनाची विशिष्ट रक्कम बाजूला काढली जाते. ही रक्कम स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून वजा केली असता निव्वळ राष्ट्रीय उत्पादन प्राप्त होते.

**NNP=GNP- D**

वरील सूत्रात NNP = Net National Product निव्वळ राष्ट्रीय उत्पादन, GNP = Gross National Product स्थूल राष्ट्रीय उत्पादन,

D = Depreciation घसारा,

उदा. विशिष्ट यंत्रसामुग्रीचा वापर करून एका वर्षाला १०० कोटी रुपयाचे उत्पादन होत असेल आणि त्या यंत्राचा घसारा खर्च वार्षिक १० कोटी रुपये असेल तर अशावेळी निव्वळ राष्ट्रीय उत्पादन १०० कोटी १० कोटी ९० कोटी राहील.

**३) स्थूल देशांतर्गत उत्पादन** (Gross Domestic Product = GDP):

"देशाच्या भौगोलिक सीमारेषेच्या आत एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित झालेल्या सर्व वस्तू व सेवांच्या बाजारमूल्याच्या बेरजेला स्थूल देशांतर्गत उत्पादन असे म्हणतात."

स्थूल देशांतर्गत उत्पादन करताना देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार केला जातो. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून देशामध्ये निर्माण होणाऱ्या काही वस्तू व सेवांची निर्यात होते तसेच विदेशात निर्माण होणाऱ्या काही वस्तू व सेवांची स्वदेशात आयात होते. निर्यात होणाऱ्या वस्तू एकूण उत्पादनातून वजा केल्या जातात व आयात होणाऱ्या वस्तू एकूण उत्पादनात मिळविल्या जातात.

वरीलप्रमाणे स्थूल देशांतर्गत उत्पादनात निर्यात व आयात वस्तूंचा विचार केला जातो परंतु स्वदेशातून विदेशात गेलेल्या उत्पन्नाचा आणि विदेशातून स्वदेशात आलेल्या उत्पन्नाचा विचार होत नाही. उदा. भारतातील काही नागरीक नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने अमेरिकेत जातात व तेथून काही उत्पन्न आपल्या कुटुंबासाठी भारतात पाठवितात. त्याचप्रमाणे अमेरिकेतील काही नागरीक नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने भारतात येतात व मिळालेले काही उत्पन्न अमेरिकेत पाठवितात. या उत्पन्नाच्या आवागमनाचा विचार स्थूल देशांतर्गत उत्पादनात होत नाही.

**४) निव्वळ देशांतर्गत उत्पादन** (Net Domestic Product = NDP)

"स्थूल देशांतर्गत उत्पादनातून (GDP) घसाऱ्याची रक्कम वजा केली असता जी राशी शिल्लक राहते. तिला निव्वळ देशांतर्गत उत्पादन असे म्हणतात."

निव्वळ देशांतर्गत उत्पादनाला शुद्ध देशांतर्गत उत्पादन असेही म्हणतात. स्थूल देशांतर्गत उत्पादन काढताना घसारा लक्षात घेतला जात नाही. परंतु निव्वळ देशांतर्गत उत्पादन काढताना घसारा लक्षात घेतला जातो. वस्तू व सेवांचे उत्पादन करताना यंत्रसामुग्री, उपकरणे, इमारत इत्यादी सारख्या भांडवली वस्तूंची झीज होते. झीज झाल्याने ह्या वस्तू

काही कालावधीनंतर निकामी होतात. निकामी झालेल्या वस्तूंच्या जागी नवीन भांडवली वस्तू बसविण्याकरिता घसारा म्हणून काही रक्कम बाजूला काढून ठेवली जाते. ही घसाऱ्याची रक्कम स्थूल देशांतर्गत उत्पादनातून वजा केली असता निव्वळ देशांतर्गत उत्पादन प्राप्त होते. पुढील सूत्राद्वारे निव्वळ देशांतर्गत उत्पादनाची संकल्पना स्पष्ट करता येईल.

**NDP= GDP - D**

वरील सूत्रात NDP = निव्वळ देशांतर्गत उत्पादन, GDP = स्थूल देशांतर्गत उत्पादन, D = घसारा (Depreciation)

**५) दरडोई उत्पन्न** (Per Capita Income = PCI)

"देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला त्या देशाच्या लोकसंख्येने भाग दिला असता जे उत्पन्न प्राप्त होते ते म्हणजे दरडोई उत्पन्न होय."

वरील व्याख्येवरून स्पष्ट होते की, देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नावरून दरडोई उत्पन्न काढले जाते. राष्ट्रीय उत्पन्नाचा संबंध देशाच्या एकूण लोकसंख्येशी असतो तर दरडोई उत्पन्नाचा संबंध प्रतिव्यक्ती उत्पन्नाशी असतो. दरडोई उत्पन्न जास्त असणे व ते वाढत जाणे हे देशाच्या आर्थिक विकासाचे एक लक्षण समजले जाते. दरडोई उत्पन्नावरून देशातील लोकांच्या राहणीमानाची व देशाच्या प्रगतीची स्थूल कल्पना येते. भारताच्या तुलनेत इंग्लंड, अमेरिका, जपान या देशाचे दरडोई उत्पन्न जास्त असल्याने ते देश विकसीत समजल्या जातात. असे असले तरी केवळ दरडोई उत्पन्नावरूनच लोकांच्या राहणीमानाची कल्पना येते असे नाही. कारण दरडोई उत्पन्न हे सरासरीवरून काढले जाते. देशात प्रचंड आर्थिक विषमता असेल तर दरडोई उत्पन्नात वाढ होऊनही लोकांच्या राहणीमानाची पातळी उंचावत नसते कारण हे वाढलेले उत्पन्न विशिष्ट अशा श्रीमंत वर्गाचेच असते.

Department of Economics
BLD Arts College Pinjar

**-----*****-----**

**प्रश्न ४- राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती स्पष्ट करा.** (Methods of Measurement of National Income)

**उत्तर -** कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना अतिशय महत्वपूर्ण आहे. कारण राष्ट्रीय उत्पन्नावरून देशाच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते. अर्थव्यवस्थेचे स्वरूप, त्यामध्ये होणारे बदल हे राष्ट्रीय उत्पन्नावरूनच कळतात. एकप्रकारे आर्थिक विकासाचा निर्देशक म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाकडे पाहिले जाते. भारतात राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचा प्रयत्न सर्वप्रथम १८६७-६८ मध्ये दादाभाई नौरोजींनी केला. आज शास्त्रीयदृष्टीने राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचे कार्य केंद्रीय सांख्यिकीय संघटना करीत आहे.

राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्धतीः (Methods of Measurement of National Income)

राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या उत्पादन गणना पद्धती, उत्पन्न गणना पद्धती आणि खर्च गणना पद्धती प्रमुख तीन पद्धती आहेत. त्यांचा खालील प्रमाणे सविस्तर विचार करू.

**अ) उत्पादन गणना पद्धती** (Production Method):

राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या या पद्धतीमध्ये उत्पादित झालेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य बाजार किंमतीनुसार मोजले जाते व त्याची बेरीज केली जाते किंवा वस्तू व सेवांच्या उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर झालेल्या वाढीव मूल्याची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न मोजले जाते.

उत्पादन गणना पद्धतीमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना वस्तू व सेवांचे दुहेरी मापन होणार नाही याची काळजी घेतली जाते. त्याकरिता अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य लक्षात घेतले जाते किंवा उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर केवळ वर्धितमूल्याचा विचार केला जातो. या पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अर्थव्यवस्थेचे वर्गीकरण तीन क्षेत्रात करण्यात येते. प्राथमिक किंवा कृषी क्षेत्र, द्वितीय किंवा उद्योग क्षेत्र आणि तृतीय किंवा सेवा क्षेत्र या तीन क्षेत्रांचा समावेश होतो.

Department of Economics
BLD Arts College Pinjar

उत्पादन गणना पद्धतीमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचे दुहेरी मापन होऊ नये म्हणून अंतिम वस्तू गणना पद्धती आणि वर्धितमूल्य गणना पद्धती या दोन पर्यायी पद्धतीचा वापर करण्यात येतो.

**ब) उत्पन्न गणना पद्धती** (Income Method):

राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या या पद्धतीमध्ये एका वर्षात देशातील सर्व व्यक्तींना व संस्थांना मिळालेल्या उत्पन्नाची बेरीज केली जाते व त्यावरून राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते. देशातील सर्व व्यक्ती व संस्थांचा समावेश उत्पादनाच्या चार घटकांमध्ये होतो. ते घटक म्हणजे भूमी, श्रम, भांडवल व संघटक होत. एका वर्षाच्या कालावधित जमीनमालकाला मिळणारा खंड, श्रमिकांना मिळणारी मजुरी, भांडवलदारांना मिळणारे व्याज व संयोजकांना मिळणारा नफा यांची बेरीज केली असता राष्ट्रीय उत्पन्न प्राप्त होते. या पद्धतीमध्ये उत्पादन घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न काढले जात असल्याने या पद्धतीला घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न मापनाची पद्धती असेही म्हणतात. विकसीत देशांमध्ये या पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते परंतु ज्या देशांमध्ये बरेच आर्थिक व्यवहार वस्तूविनिमय पद्धतीने केले जातात अशा देशांमध्ये ही पद्धती उपयुक्त ठरत नाही.

उत्पन्न गणना पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केल्याने, अर्थव्यवस्थेच्या कोणत्या क्षेत्रातून किती उत्पन्न प्राप्त होते याची कल्पना येते तसेच देशात उत्पन्नाचे वाटप समान आहे की विषम आहे याची कल्पना येते. उत्पन्न गणना पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न पुढील सूत्रानुसार मोजले जाते.

राष्ट्रीय उत्पन्न = खंड + मजुरी + व्याज + नफा **(NI=R+W+1+P)**

NI= National Income, R=Rent, W=Wages, I = Interest, P = Profit

राष्ट्रीय उत्पन्नाचे उत्पन्न गणना पद्धतीने मापन करताना एकच उत्पन्न दोन वेळा मोजले जाऊ नये विनामूल्य केलेल्या सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात टाळावा जुन्या वस्तूंची विक्री करून मिळालेल्या पैशांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करू नये इत्यादी बाबींची दक्षता घ्यावी लागते.

**क) खर्च गणना पद्धती** (Expenditure Method):

"एका वर्षाच्या कालावधित देशातील सर्व व्यक्तींनी, उद्योग संस्थांनी आणि शासनाने उपभोगावर केलेल्या आणि गुंतवणुकीवर केलेल्या एकूण खर्चाची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय."

देशातील सर्व व्यक्ती वस्तू व सेवांच्या उपभोगावर खर्च करीत असतात. विविध उत्पादन संस्था उत्पादन कार्यासाठी खर्च करीत असतात. तसेच सरकार सार्वजनिक हिताच्या कार्यासाठी खर्च करीत असते. या सर्व खर्चाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते. तसेच व्यक्तींनी, संस्थांनी आणि सरकारने केलेल्या गुंतवणूक खर्चाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते.

थोडक्यात या पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना कुटुंब संस्थांनी, उद्योग संस्थांनी, व्यवसाय संस्थांनी, शासनांने केलेल्या सर्व प्रकारच्या खर्चाची बेरीज केली जाते. राष्ट्रीय उत्पन्न मोजतांना उपभोग खर्चासोबतच गुंतवणूक खर्चही लक्षात घेतला जातो. कारण लोक आपल्या उत्पन्नाचा काही भाग उपभोगावर खर्च करतात व काही भागाची बचत करतात. या बचत केलेल्या भागामधूनच गुंतवणूक केली जाते.

राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या खर्च गणना पद्धतीचे सूत्र -

राष्ट्रीय उत्पन्न = उपभोग खर्च + गुंतवणूक खर्च + शासनाचा खर्च + (निर्यात-आयात) **NI= C+I+G+(X-M)**

NI = National Income, C = Consumption Expenditure, I = Investment Expenditure, G=Government Expenditure, X = Export M = Import

राष्ट्रीय उत्पन्नाचे खर्च गणना पद्धतीने मापन करताना खर्चाची दुहेरी गणना टाळण्यासाठी अंतिम वस्तूवरील खर्चच लक्षात घ्यावे, खर्चाविषयी बिनचूक व विश्वसनीय आकडेवारी इत्यादी दक्षता घ्यावी लागते.

राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या वरील तिन्ही पद्धतीपैकी उत्पादन व उत्पन्न गणना पद्धती अधिक लोकप्रिय असून बहुतेक देशांमध्ये या पद्धतींचा वापर करण्यात येतो. भारतामध्ये या दोन्ही पद्धतीचा संयुक्तपणे वापर करण्यात येतो. इंग्लंड व अमेरिका सारख्या विकसीत देशांमध्ये उत्पन्न गणना पद्धती अधिक लोकप्रिय आहे.

**-----*****-----**

**प्रश्न ५- राष्ट्रीय उत्पन्न मोजताना येणाऱ्या अडचणी / मर्यादा स्पष्ट करा.**

**उत्तर -** प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे निश्चितपणे मापन करणे कठीण असते. राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना प्रामुख्याने ज्या अडचणी येतात त्या अडचणीचे वर्गीकरण पुढील दोन गटात केले जाते. अ) तात्विक किंवा संकल्पनात्मक स्वरूपाच्या अडचणी , ब) व्यावहारिक स्वरूपाच्या अडचणी

**अ) तात्विक किंवा संकल्पनात्मक स्वरूपाच्या अडचणीः**

तात्विक किंवा संकल्पनात्मक स्वरूपाच्या अडचणींमध्ये पुढील अडचणींचा समावेश होतो.

**१) अनुत्पादक कार्याच्या मापनासंबंधीची अडचणः**

राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना केवळ उत्पादक कार्यच लक्षात घेतले जातात. ज्या वस्तू व सेवांचा विनिमय पैशात होतो, अशाच वस्तू व सेवांचा समावेश उत्पादक कार्यात होतो. परंतु ज्या वस्तू व सेवांचा विनिमय पैशात होत नाही, अशा वस्तू व सेवांना अनुत्पादक समजले जाते व त्यांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात होत नाही. उदा. गृहिणीने कुटुंबाची केलेली सेवा, समाजसुधारकांनी केलेले सामाजिक कार्य याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात होत नाही.

**२) हस्तांतरित उत्पन्नासंदर्भात अडचणः**

निवृत्त कर्मचाऱ्यांना मिळणारे पेन्शनच्या स्वरूपात वेतन, वृद्ध व असहाय्य लोकांना मिळणारे अर्थसहाय्य, बेकारांना मिळणारा भत्ता, धार्मिक व सामाजिक संस्थांना मिळणारी देणगी या सर्वांचा समावेश हस्तांतरित उत्पन्नात होतो. या हस्तांतरित उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात होत नाही. कारण हे उत्पन्न म्हणजे सरकार किंवा इतर व्यक्तींचा खर्च असतो. शिवाय या खर्चापासून कोणत्याही स्वरूपाचे उत्पादन होत नाही.

**३) अवैध व्यवहारांपासून मिळणाऱ्या उत्पन्नासंबंधीची अडचणः**

भ्रष्टाचार, चोरी, खंडणी, जुगार, तस्करी यासारख्या अवैध व्यवहारांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची आकडेवारी सरकारी दप्तरी नोंदविली जात नाही कारण ते सरकार मान्य नसतात. त्यामुळे अशा व्यवहारांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश व काळया पैशाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात होत नाही.

**४) सार्वजनिक सेवांचे मूल्य ठरविण्यासंबंधी अडचणीः**

नवीन कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमुळे सरकार आपल्या जनतेचे बाह्य आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी मोठे सैन्यदल उभे करते. देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था राहावी याकरीता पोलीस यंत्रणा, न्यायव्यवस्था निर्माण करते. तसेच समाजाच्या कल्याणासाठी सार्वजनिक पाणीपुरवठा, वीजपुरवठा, सिंचनसुविधा, रस्तेबांधणी, रेल्वे वाहतूक, बँकिंग सुविधा, पोस्ट सुविधा, आरोग्य सुविधा, विमा सुविधा, सार्वजनिक वितरण सुविधा इत्यादी सेवा पुरविते. परंतु अशा सुविधांचे बाजारमूल्य ठरविणे कठीण असते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न मोजतांना अडचणी निर्माण होतात.

**५) उत्पादनाच्या स्वउपभोगासंबंधी अडचणीः**

ग्रामीण भागातील शेतकरी, लघु व कुटीर उद्योजक झालेले उत्पादन बाजारात पूर्णपणे विक्रीसाठी आणत नाही. त्यातील काही भाग स्वतःच्या व कुटुंबाच्या उपभोगासाठी वापरतात. अशा स्व उपभोगासाठी वापरलेल्या उत्पादनाचे बाजारमूल्य काढणे कठीण असते त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न मोजतांना अडचण निर्माण होते.

**ब) व्यावहारीक स्वरूपाच्या अडचणी:**

राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अचूक सांख्यिकीय आकडेवारी उपलब्ध होणे आवश्यक असते. परंतु ही आकडेवारी मिळविताना खालील व्यावहारीक अडचणी निर्माण होतात.

**१) अपुरी व अविश्वसनीय आकडेवारी:**

राष्ट्रीय उत्पन्नाचे अचूक मोजमाप होण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांची अचूक व विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध होणे आवश्यक असते. परंतु भारतासारख्या खंडप्राय व विकसनशील देशामध्ये आजही शेतकरी, लघु व कुटीर उद्योग करणारे, शेतमजूर व बांधकाम मजूर इत्यादींकडे आपल्या उत्पन्न वा खर्चाची आकडेवारी उपलब्ध नसते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न मोजतांना अडचणी निर्माण होतात.

**२) दुहेरी मापनाची अडचण :**

राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना दुहेरी मापन होऊ नये म्हणून अंतिम वस्तूचे मूल्य लक्षात घेतले जाते. परंतु काही वस्तू अशा असतात की, त्या वस्तूंचा समावेश मध्यम वस्तूंमध्ये करावा की अंतिम वस्तूंमध्ये करावा हा प्रश्न निर्माण होतो. उदा. साखर ही वस्तू उपभोक्त्यांकडून प्रत्यक्ष उपभोगासाठी वापरली जाते म्हणून ती अंतिम वस्तू ठरते. परंतु त्याच साखरेचा वापर करून दुकानदार मिठाई बनवितो, तेव्हा साखरचा समावेश मध्यम वस्तूमध्ये होतो. अशावेळी दुहेरी मापनाची समस्या निर्माण होते.

**३) अमौद्रिक क्षेत्राचे अस्तित्व :**

ज्या क्षेत्रात पैशाचा वापर न करता वस्तूचे उत्पादन व विनिमय केला जातो अशा क्षेत्राला अमौद्रिक क्षेत्र असे म्हणतात. आजही भारताच्या ग्रामीण भागात शेती व्यवसाय उदरनिर्वाहासाठी केला जातो. शेती उत्पादनाचा बराच मोठा भाग वैयक्तिक उपभोगासाठी वापरला जातो. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न मोजताना अडचणी निर्माण होतात.

Department of Economics
BLD Arts College Pinjar

**४) असंघटित क्षेत्राचे अस्तित्व:**

आजही भारताच्या ग्रामीण भागात असंघटित क्षेत्राचे प्रमाण मोठे आहे. शेती क्षेत्रात काम करणारे शेतकरी व शेतमजुर, कुटीर उद्योगांमध्ये काम करणारे कारागिर, छोटा-मोठा व्यवसाय करणारे व्यावसायिक, घरकाम करणाऱ्या स्त्रीया व मजूर, बांधकाम मजूर या सर्वांचा समावेश असंघटित क्षेत्रात होतो. हा असंघटित वर्ग आपल्या उत्पन्न व खर्चाची नोंद ठेवत नसतो. तसेच त्यांची नोंद सरकारी दप्तरी नसल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न मोजताना अडचणी निर्माण होतात.

**५) क्षेत्रानुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन:**

राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अर्थव्यवस्थेचे तीन क्षेत्रात विभाजन केले जाते. ते म्हणजे प्राथमिक किंवा कृषी क्षेत्र, द्वितीय किंवा उद्योग क्षेत्र आणि तृतीय किंवा सेवा क्षेत्र या तीन क्षेत्रानुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अनेक अडचणी निर्माण होतात. उदा. भारतात शेतमजूर सहा ते आठ महिने शेतात काम करतो व चार ते सहा महिने शहरात जाऊन मिळेल ते काम करतो. अशावेळी त्याला मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश कृषीक्षेत्रात करायचा, उद्योगक्षेत्रात करायचा की सेवाक्षेत्रात करायचा हा प्रश्न निर्माण होतो.

**६ ) घसारा मापनासंबंधी अडचणी:**

उत्पादन प्रक्रियेमध्ये वापरल्या जाणाऱ्या भांडवली वस्तू व यंत्रसामुग्रीची होणारी झीज म्हणजे घसारा होय. भांडवली वस्तूंची व यंत्रसामुग्रीची झीज अनेक गोष्टींवर अवलंबून असते. यंत्राची योग्य निगा राखली तर यंत्राचे आयुष्य

वाढते. त्यामुळे घसारा कमी होतो. परंतु ह्या गोष्टी न केल्यास घसारा वाढतो. म्हणून घसाऱ्याचे निश्चित मोजमाप करणे कठीण आहे.

अर्थव्यवस्थेचे स्वरूप राष्ट्रीय उत्पन्नाच्या स्थितीवरून निश्चित होते. देशाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे निश्चितपणे मापन करणे कठीण असते. म्हणूनच राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना तात्विक आणि व्यावहारिक स्वरूपाच्या अडचणी वरीलप्रमाणे निर्माण होतात.

**-----*****-----**

Department of Economics
BLD Arts College Pinjar